दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक ४० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.११ मे २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पनवेल महापालिकेत आपत्ती व्यवस्थापन बैठक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आयुक्त गणेश देशमुख यांच्या सुचनेप्रमाणे मान्सूनपूर्व करावयाची कामे तसेच आपत्ती व्यवस्थापन विषयक महत्वाच्या सुचना देण्यासाठी उपायक्त सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेतील विभाग प्रमुख अधिकारी यांची बैठक घेण्यात आली.

यावेळी सहाय्यक आयुक्त सुवर्णा देखणे, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, उपअभियंता विलास चव्हाण, सर्व प्रभाग अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, अग्नीशमन विभागप्रमुख अनिल जाधव, सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. आपत्ती व्यवस्थापन, मदत पुर्नवसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी नुकत्याच घेतलेल्या बैठकित दिलेल्या सूचनेप्रमाणे पावसाळ्यापूर्वीची कामे, नाले सफाई, धोकादायक इमारतीनिष्कांसित करणे, धोकादायक वृक्ष तोडणे तसेच फांद्या तोडणे, अर्धवट बांधकामे पूर्ण करणे अशा विविध सूचना यावेळी संबधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

तसेच नियंत्रण कक्ष स्थापन करणे, समन्वय अधिकाऱ्यांची नेमणूक करणे, आपत्ती काळात नागरिकांना सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी जागांची निवड करणे, त्यांच्या प्राथमिक गरजा, औषधोपचारांची पूर्तता करण्याची सोय करण्यासाठीचे नियोजन करण्याच्या सूचना उपायुक्त पवार यांनी दिल्या. पूर, अतिवृष्टी काळात पाणी साठू नये यासाठी पावसाळ्यापूर्वी नालेसफाई, चेंबर सफाई, अद्ययावत पंप्सची सोय करणे, झाडे पडल्यास ती बाजूला करण्यासाठी कटर त्यासाठी लागणारे मनुष्यबळ वाढविणे याबाबत सूचना देण्यात आल्या.

यावर्षी पाऊस लवकर सुरू होणार असल्याने पालिकेतील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांनी आपली तयारी सुरू करून त्याअधिक बळकट करण्याच्या सुचना यावेळी देण्यात आल्या.

# पोलादपूर एसटी स्थानकामध्ये वृध्देच्या हातातील बांगड्यांची चोरी

## दोन तोळे सोन्याचा ऐवज सराईतपणे चोरला

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

काटेतळी येथून पोलादपूर एस.टी. स्थानकामध्ये चरई गावात जाण्यासाठी पोलादपूर बोरावळे एस.टी.बसमध्ये बसण्यासाठी गाडीत चढणाऱ्या वृध्द महिलेच्या उजव्या हातातील प्रत्येकी एक तोळा सोन्याच्या दोन बांगड्या सराईत चोरट्यांनी कापून नेल्याच्या घटनेने पोलादपूर पोलीस चक्रावून गेले आहेत. यापूर्वी पोलादपूर एस.टी. स्थानकातून एका आदिवासी महिलेचे बाळ चोरीला गेले तरी पोलीसांना चोरट्यांचा तपास लागत नसल्याने जनतादेखील हवालदिल झाली आहे.

पोलादपूर तालुक्यातील चरई हनुमानवाडीतील वृध्द महिला सुनंदा दिनकर सकपाळ ही काटेतळीला गांवदेवीच्या पूजेला आली असता तेथे मुक्काम करून त्यांच्या चुलत बहिण वनिता रामदास सकपाळ हिच्यासोबत सकाळी चरई येथे जाण्यासाठी पोलादपूर एस.टी.स्थानकामध्ये आल्या. यावेळी पोलादपूर बोरावळे गाडीची वाट बघत थांबल्या. तेथे बोरावळेला जाणारी एस.टी.बस साधारणतः ९ वाजता आली असता दोघी गाडीमध्ये बसण्यासाठी चढत असताना तीन व्यक्ती दरवाजातच उभ्या होत्या. त्यामुळे त्यांचा गाडीच चढण्यात अडथळा होऊन वनिता सकपाळ हिने तुम्ही गुंड आहात काय, गाडीत चढायचे नसेल तर आम्हाला अडचण का करता, असे सुनावले तर त्यांनी कंडक्टर नसल्याने आम्ही उतरत आहोत असे सांगून तिघेही मराठी भाषेतच उत्तर देत गाडीतून उतरले. दोघीही गाडीमध्ये बसल्या.

त्यावेळी सुनंदा सकपाळ यांना त्यांच्या उजव्या हातातील दोन सोन्याच्या बांगड्या नसल्याचे लक्षात आले. यावेळी गोऱ्या रंगाचा उंचपुरा व काळे हाफ टिशर्ट आणि हाफ पँट घातलेला दाढी वाढलेल्या इसमासह अन्य दोन व्यक्तींचा या चोरीत सहभाग असल्याचा संशय यावेळी वृध्द महिलेने व्यक्त केला आहे.

पोलादपूर एस.टी.स्थानकामध्ये सीसीटिव्ही कॅमेरे नसल्याने चोरी करणाऱ्या व्यक्तींबाबत तपास लावण्याचे आव्हान पोलादपूर पोलीसांसमोर जड जात असून या चोरीवेळी पोलीसांनी तातडीने पोलादपूर शहरामध्ये विविध दुकानांमध्ये चौकशी करून चोरटे शहरामध्ये आले अथवा परस्पर महामार्गावरून फरार झाले याची चौकशी करण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान, वृध्द महिलेने तिचा मुलगा शंकर सकपाळ याच्यासोबत चर्चा करून पोलादपूर पोलीसांकडे या चोरीची रितसर फिर्याद दिली.

# पांडवकडा धबधबा पर्यटन विकास आराखडा तयार करा : ना.आदिती तटकरे



**दै.रायगड नगरी । मुंबई**

वनविभागाच्या निकषांचा विचार करुन डॉ. चिंतामणराव देशमुख जैवविविधता वन व वनस्पती उद्यानाची उभारणी करा, असे निर्देश पर्यटन, क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री श्रीमती आदिती तटकरे यांनी दिले. मौजे जामगांव, ता. रोहा, जि. रायगड येथील प्रस्तावित उद्यानाबाबत मंत्रालयातील दालनात झालेल्या बैठकीत मंत्री श्रीमती तटकरे बोलत होत्या. यावेळी पनवेल येथील पांडवकडा धबधबा विकास आराखडा तयार करणे, किहीम येथील विकास कामे आणि पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली पक्षी अभ्यास व संशोधन केंद्र आदींबाबतही बैठका पार पडल्या. बैठकीस उपवन संरक्षक (अलिबाग) आशिष ठाकरे व अन्य अधिकारी उपस्थित होते. यावेळी दूरदृश्य प्रणालीद्वारे इको टुरिजम बोर्डाचे चेअरमन विकास गुप्ता, प्रधान मुख्य वनसंरक्षक प्रदीप कुमार सहभागी झाले होते.

मंत्री श्रीमती तटकरे म्हणाल्या, ४४ हेक्टर क्षेत्रावर अस्तित्वात येणाऱ्या या प्रकल्पासाठी वनविभागाने सल्लागार नेमून प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करावा. सल्लागार नेमल्यानंतर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे सोपे होईल. ज्यांनी यापूर्वी राज्य शासनाकडे संबंधित विषयाबाबत सल्लागार म्हणून काम केले आहे अशांपैकी एक सल्लागार नेमून उद्यानाबाबतचा आराखडा तयार करावा, असे निर्देश मंत्री श्रीमती तटकरे यांनी दिले. अनुभवी सल्लागाराच्या मदतीने तयार केलेला सदर प्रस्ताव इको टूरीजम बोर्डाकडे पाठवून पुढील कार्यवाही करता येईल, असेही त्या म्हणाल्या.

पनवेल येथील पर्यटकांचे आकर्षणस्थळ असलेला पांडवकडा धबधब्याच्या विकासासंदर्भातील विकास आराखडा तयार करण्याचे निर्देशही मंत्री श्रीमती तटकरे यांनी पर्यटन विभागास दिले. पांडवकडा येथे मूलभूत सुविधा देणे हा मूळ उद्देश असून त्यादृष्टीने सुधारित प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश त्यांनी बैठकीदरम्यान दिले. यावेळी सिडकोचे मुख्य नियोजनकार आशुतोष उईके यांनी पांडवकडा प्रकल्पाचे सादरीकरण केले. या बैठकीस सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक – ३, डॉ. कैलास शिंदे ऑनलाईन उपस्थित होते. सिडकोच्या माध्यमातून पांडवकडा प्रकल्पास सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

सिडकोने वनविभागाकडे सदर प्रकल्पाचा प्रस्ताव सादर करावा, वनविभागाने रितसर तपासणी करुन नियमानुसार प्रकल्पास मान्यता द्यावी, प्रकल्पक्षेत्र वनजमिनीत असल्याने त्यासंदर्भात आवश्यक सर्व नाहरकत प्रमाणपत्रे सिडकोस उपलब्ध करुन द्याव्यात, सिडकोने प्रकल्प एजन्सी म्हणून विकसित करावा, आदी निर्देश मंत्री श्रीमती तटकरे यांनी दिले.

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली यांच्या किहीम या जन्मगावी पक्षी अभ्यास व संशोधन केंद्राचा आराखडा आणि किहीम येथील विकासकामांबाबतचा प्रस्ताव यावेळी सादर करण्यात आला. डॉ. सलीम अली यांची ओळख सांगणारी शिल्पे बनवून ती केंद्र परिसरात बसविण्यात यावीत, शिल्प बनविण्याचे काम जे. जे. स्कूल ऑफ आर्टकडे देण्यात यावे असे निर्देशही मंत्री श्रीमती तटकरे यांनी दिले. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (बीएनएचएस), जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांची समिती तयार करण्याचे निर्देशही मंत्री श्रीमती तटकरे यांनी दिले.

सदर प्रकल्प ५ टप्प्यांमध्ये ...//२

# पनवेलमधील आंब्याच्या दुकानात लागलेल्या आगीत मोठे नुकसान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील एका आंब्याच्या दुकानाला अचानक पणे लागलेल्या आगीत मोठे नुकसान झाल्याची घटना घडली आहे.

पनवेल महानगर पालिकेच्या जवळील जय भारत नाक्यावरील एका आंब्याच्या दुकानाला सोमवारी रात्री आग लागली.

या आगीची माहिती मिळताच पनवेल महानगर पालिकेच्या अग्निशमक दलाची गाडी घटनास्थळी आली व जवानांनी ही आग आटोक्यात आणली. आगीचे कारण अद्याप समजू शकले नाही व कोणतीही जीवितहानी झालेली नसून दुकानातील आंब्याचे नुकसान झाले आहे.

## संक्षिप्त...

# निवडणूक आयोगाचे महत्त्वाचे आदेश

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील मुंबई महापालिका वगळता सर्व महापालिका व नगरपरिषदांसाठी बहुसदस्यीय प्रभाग प्रणाली पुन्हा सुरू करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या दोन्ही याचिका हायकोर्टाने फेटाळल्या आहेत. त्यामुळे पालिकांच्या निवडणुका बहुसदस्यीय प्रभागरचनेनुसारच होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यातच सर्वोच्च न्यायालयाने पुढील २ आठवड्यात निवडणुकांच्या तारखा जाहीर करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला दिले होते. त्यानुसार, आयोग कामाला लागला असून आयोगाकडून आज महत्त्वाचे आदेश देण्यात आले आहेत.

महापालिका निवडणूक संदर्भात राज्य निवडणुक आयोगाने महत्त्वाचे आदेश दिले आहेत. त्यानुसार, ११ मेपर्यंत अंतिम प्रभाग रचना काम पूर्ण करण्यात येणार असून १२ मे पर्यंत प्रभाग रचनेचा अंतिम प्रस्ताव राज्य निवडणुक आयोगाकडे मान्यतेसाठी पाठवावा लागणार आहे. १७ मे पर्यंत प्रभाग रचना अंतिम प्रसिद्ध करावी लागणार आहे.

त्यानंतर, १७ मे रोजी अंतिम प्रभाग रचना यादी शासन राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करण्याचे निर्देशही राज्य निवडणुक आयोगाने दिले आहे. दरम्यान, यासंदर्भात राज्यातील मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, अमरावती, नवी मुंबई वसई विरार उल्हासनगर कोल्हापूर अकोला सोलापूर नाशिक , पिंपरी चिंचवड, कल्याण डोंबिवली महापालिकांना आयोगाने पत्र लिहिले आहे.

# विस्तारणाऱ्या उरणला ओढावणार भविष्यात पाणी टंचाईचे संकट

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्याच औद्योगिकीकरण आणि नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे पाण्याची तहान भागविणारे जलस्रोत अपुरे पडू लागल्याने अनेक भागात पाणी टंचाईचे संकट ओढावले आहे. त्यात रानसई धरणाची उंची वाढविण्याचा प्रस्ताव आज ही शासनस्तरावर पडून राहिला असल्याने वाढत्या औद्योगिकीकरणामुळे व वाढत्या लोकसंख्येमुळे पाणीटंचाईची समस्या भविष्यात उरणमध्ये तीव्र रुप धारण करेल, यात शंका नाही.



उरण तालुका हा अरबी समुद्राच्या कुशीत आणि मुंबई शहराच्या हाकेच्या अंतरावर वसलेला तालूका आहे. या तालुक्यात एन.ए.डी, ओएनजीसी, जेएनपीटी बंदर,भारत गॅस, महावितरण प्रकल्प हे केंद्र व राज्य सरकारचे महत्त्वाचे प्रकल्प असून या प्रकल्पावर आधारित इतर अनेक प्रकल्प उद्यास येत आहेत. या प्रकल्पांना, रहिवाशांना उरण तालुक्यातील रानसई व पुनाडे धरणातून पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तसेच सिडकोच्या माध्यमातून पेण तालुक्यातील हेटवणे धरणातून पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सध्या उरण तालुक्याची लोकसंख्या ही अडीच लाखांहून अधिक आहे.

उरण तालुक्याच्या ...//२

# पेण येथील तलाठी भवन इमारतीसाठी ५० लाख रुपये निधी देणार : खा.सुनील तटकरे

## रायगड जिल्हा तलाठी भवन भुमिपुजन सोहळा संपन्न



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील पाटणोली येथे रायगड जिल्हा तलाठी भवनाची ईमारत दिमाखात उभी राहणार आहे. सदर नियोजित इमारतीच्या भूमिपूजनाचा सोहळा रायगडचे खासदार सुनिल तटकरे यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले. पेण येथील तलाठी भवन इमारतीसाठी ५० लाख निधी देणार असल्याचे यावेळी सुनिल तटकरे यांनी जाहीर केले.

सदरच्या ईमारतीच्या भूखंडा करिता संघटनेच्या ४०० सभासदांनी वर्गणी काढून ३३ लाख रुपये जमा करून साडेसहा गुंठे बिनशेती जागा घेतली आहे. या भूखंडावर भविष्यात दोन माळ्याची इमारत उभारण्यात येणार आहे. पहिल्या मजल्यावर तलाठी संघटनेचे कार्यालय व प्रशस्त हॉल बांधण्यात येणार आहे. तर दुसऱ्या मजल्यावर तलाठी संघटनेची पतसंस्था तसेच कामानिमित्त येणाऱ्या तलाठ्यांच्या निवासा करिता ४ खोल्या बांधण्यात येणार आहेत, अशी माहिती तलाठी संघाचे जिल्हाध्यक्ष संतोष जांभळे यांनी यावेळी दिली.

यावेळी बोलताना खासदार सुनिल तटकरे यांनी सांगितले की, रायगड जिल्हा तलाठी भवनाच्या नियोजित इमारती करीता आमदार अनिकेत तटकरे यांच्या निधीतून १५ लाख रुपयांचा निधी दिला असून, खासदार निधीतूनही ५० लाख रुपयांच्या निधीची ...//२

# अखेर पावसाळ्यात वाकण पाली खोपोली राज्य महामार्गावरून विनाविघ्न प्रवास

## पाली अंबा नदी पुलाचा अडसर दूर ; भालगुल व जांभुळपाडा पुलांचे काम पूर्णत्वाकडे

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

मागील अनेक वर्ष पाली खोपोली राज्य महामार्गावरील पुलांवरुन पाणी जाऊन सातत्याने धोक्याची स्थिती निर्माण होत होती. शिवाय वाहतुकीस देखील अडथळा निर्माण होई. वाकण पाली खोपोली या राज्य महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम मागील ५ वर्षांपासून सुरू आहे. या मार्गावर पाली अंबा नदी पुलाचे काम अनेक महिन्यांपासून रखडले होते. मात्र हा अडसर दूर झाल्याने या पुलाच्या कामाला वेग आला आहे. तर भालगुल व जांभूळपाडा येथील अंबा नदी वरील नवीन पुलांचे काम पूर्णत्वाकडे आहे. पावसाळ्यात पाली व जांभूळपाडा पुलांवरून पाणी जाते. मात्र येथे आता नवीन उंच, रुंद व अधिक क्षमतेचे पूल झाल्याने पावसाळ्यात पाणी जाणार नाही. यामुळे वाहतूक सुरळीत राहून प्रवासी, चाकरमानी व वाहन चालकांची कित्येक दशकांची गैरसोय थांबणार आहे.



तीन महिन्यांपूर्वी जांभूळपाडा अंबा नदीवरील एक पूल बनून तयार झाला असून त्यावरून वाहतूक सुरू झाली आहे. येथील दुसऱ्या पुलाचे काम देखील युद्धपातळीवर सुरू आहे. तसेच भालगुल येथील दोन्ही पूल मे अखेर पर्यंत वाहतुकीसाठी सुरू होण्याची शक्यता आहे. मात्र पाली अंबा नदीवरील पुलाचे काम थांबले होते. येथील शेतकऱ्यांचे जमीन मोबदला व इतर मागण्यांसाठी एमएसआरडीसी सोबत वाद होता. परिणामी पुलाचे काम रखडले होते. मात्र या प्रकरणी पाली पोलीस निरीक्षक विश्वजीत काइंगडे यांनी महत्वाची भूमिका बजावली. त्यांनी एमएसआरडीसी प्रशासन व शेतकरी यांच्यात समेट घडवून आणला. त्यामुळे या शेतकऱ्यांनी देखील जागा देऊ केली. या सर्व प्रक्रियेत पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्यासह एमएसआरडीसी उपअभियंता सचिन निफाडे, पालकमंत्री अदिती तटकरे यांचे खाजगी ...//२

# श्रीवर्धन तालुक्यात देखभाल व दुरुस्तीच्या नावाखाली अघोषित भारनियमन सुरू

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्यात महिन्यातून चार ते पाच वेळा वीज वाहिन्यांच्या दुरुस्ती व देखभालीच्या कामासाठी वीज पुरवठा खंडित करण्यात येतो. महिन्यातून चार ते पाच वेळा वीजपुरवठा खंडित ठेवून खरोखरच वीज वाहिन्यांच्या दुरुस्तीचे किंवा देखभालीचे काम करण्यात येते की भारनियमन सुरू करण्यात आले आहे? अशी चर्चा नागरिकांमधून होताना दिसत आहे. एवढ्या वेळा दुरुस्तीची कामे करून सुद्धा पावसाळा सुरू होताच महावितरणचा वीज पुरवठा क्षणाक्षणाला खंडित होण्याचा प्रकार घडत असतो. वीज पुरवठा खंडित का झाला आहे? याबाबत विचारणा केली असता वीजवाहिनी मध्ये बिघाड झाला असून दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर वीज पुरवठा सुरळीत होईल असे सांगण्यात येते. मग दिवस दिवस वीज वाहिन्यांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी जेव्हा वीजपुरवठा खंडित केला जातो तेव्हा दुरुस्तीची कामे केली जात नसावीत. असाच अंदाज लावणे योग्य ठरेल. ज्या वेळेला एखादा वीज ग्राहक नवीन मीटर घेतो त्यावेळेला महावितरण त्या ग्राहकाकडून डिपॉझिट म्हणून ...//२

# नवी 'लक्ष्मी मुक्ती'!

राजर्षी शाहू महाराजांच्या पुरोगामी शिकवणीचा पाईक असणाऱ्या कोल्हापूर जिल्ह्यात या परंपरेला साजेशी घटना घडली आहे. शिरोळ तालुक्यातील हेरवाडच्या गावकऱ्यांनी पुढचे पाऊल टाकले. दहा हजार वस्तीच्या या गावच्या ग्रामसभेत 'यापुढे गावातील विधवांचे कुंकू पुसणे, गळ्यातील मंगळसूत्र तोडणे किंवा बांगड्या फोडणे या प्रथा बंद करण्यात येतील; तसेच त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार जपण्यात येईल,' असा ठराव केला आहे. हे पाऊल छोटे, भावनिक किंवा प्रतीकात्मक वाटले, तरी महिलांच्या आत्मसन्मानाची बूज राखण्याएवढी संवेदनशीलता महाराष्ट्रात शिल्लक आहे, याची ती निजखूण आहे. महाराष्ट्र सरकारने या गावाचा गौरव तर केलाच पाहिजे; शिवाय असा विचार करणाऱ्या सगळ्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहन दिले पाहिजे. राजा राममोहन रॉय यांनी १८२९मध्ये ब्रिटिश संसदेत सतीविरोधी कायद्याची मागणी केली, त्याला आता दोनशे वर्षे होतील. आज पतीच्या चितेवर बायका प्रत्यक्ष चढत नसतील; पण वर उल्लेख केलेल्या चालीरीती तिच्या आयुष्यातला सारा अर्थ काढून घेणाऱ्या आहेत. पतीनिधनानंतर बाईने चिपाड बनून दिवस काढावेत आणि आपली कुडी आश्रयदात्यांसाठी राबवावी, असा या प्रथांचा सुप्त अर्थ आहे. हेरवाडकरांचे हे बंड अचानक झालेले नाही. करोनाचा अंमल सुरू झाल्यापासून राज्यभरातून विधवांची कशी ससेहोलपट चालू आहे, याच्या असंख्य करुणकथा ऐकू येत आहेत. या कथांनी व्यथित होऊन अनेक सामाजिक संस्था, कार्यकर्त्यांनी महिलांच्या सन्मानासाठी संघटन आणि संघर्ष सुरू केला. हेरवाडचा ग्रामठराव हा या लढ्यातील दुवा आहे. समतेच्या या ठिणगीची मशाल व्हायला हवी. महिला कमावती असो, घरराबती असो की शिकती असो; तिचे सारे जीवन पुरुषकेंद्री, पुरुषप्रधान आणि पुरुषावलंबी हवे, हीच मानसिकता घेऊन आपण आजही जगतो आहोत. शहरे आणि महानगरांमधली दृष्य स्त्री-पुरुष समानता कचकड्याची आहे. समाजातील प्रत्येक महिलेची सार्वत्रिक, निरपवाद आणि स्वेच्छाधिकारी समानता ही आजही दंतकथा आहे. अशा वेळी, पतीनिधनानंतर महिलांना आभूषणविहीन, असहाय आणि आश्रित बनविणे, हे तिचा केवळ देह शिल्लक ठेवून सारे अस्तित्व 'सती देण्या'सारखेच आहे. ज्या संस्कृतीचे गोडवे गाण्याची सध्या आसुरी स्पर्धा चालू आहे; त्या संस्कृतीत नवरा मरण पावलेल्या एखाद्या विशी-बाविशीतील मुलीला सर्वांसमोर अशी अपमानास्पद वागणूक देऊन, तिचे मन मारून टाकून तिचे अस्तित्व अर्थहीन बनविणे, कसे काय बसते? या अंध:कारात काही पणत्या तेवत आहेत. सोलापूर जिल्ह्याच्या करमाळा येथील प्रमोद नामदेव झिंजाडे या ६४ वर्षांच्या शेतकऱ्याने २९ मार्चला तहसीलदारांसमोर 'माझ्या मृत्यूनंतर माझ्या पत्नीने यातील एकही प्रथा पाळता कामा नये आणि तिच्यावर कुणी तशी सक्तीही करता कामा नये,' असे प्रतिज्ञापत्र केले. या प्रतिज्ञापत्रातून नवेच वातावरण तयार झाले आणि गावोगावच्या अनेक शहाण्या तरुणांनी झिंजाडे यांच्याशी संपर्क साधला. 'आम्हीही अशी प्रतिज्ञापत्रे करतो' म्हणणारे गट पुढे येऊ लागले. याच घटनाक्रमातली पुढची कडी म्हणजे, नाशिकला १६ एप्रिल रोजी झालेले विधवांच्या सन्मानासाठी झालेले कार्यकर्त्यांचे अभ्यास शिबीर. येथे प्रमोद झिंजाडे होते; तसेच राजू शिरसाठ, मुक्तेश्वर मुनशेट्टीवार हे कार्यकर्तेही होते. हेरवाड येथे जो ठराव झाला, त्या ठरावाची मूळ कल्पना या शिबिरात पुढे आली. राज्यातील प्रत्येक ग्रामसभेने हा विधवा महिला सन्मानाचा ठराव करून राज्य सरकारकडे पाठवावा, असेही त्या वेळी ठरले. हेरवाडने तसा श्रीगणेशा केलाच आहे. करोनाकाळात वैधव्य आलेल्या महिलांसाठी 'एकल महिला पुनर्वसन समिती' हेरंब कुलकर्णी व इतरांच्या पुढाकाराने स्थापन झाली. त्याच प्रयत्नातून पुढे सरकारने तालुका स्तरावर 'मिशन वात्सल्य समिती' नेमल्या. यातून आजवर नेमके किती काम झाले? किती विधवा महिलांना सरकारने आधार दिला? घरे बांधून दिली? त्यांच्या रोजगारासाठी व त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले? करोनाची लाट ओसरताच या समित्या थंडावल्या आहेत. सरकारने विधवा महिला सन्मान कायदा करावा, अशी मागणी आता सामाजिक कार्यकर्ते करीत आहेत. ती योग्यच आहे; मात्र असा कायदा झाल्याने गावोगावच्या विधवा (आणि इतरही) महिलांना लागलीच सन्मानाची आणि समतेची वागणूक मिळणार आहे का? तसे व्हायचे असेल, तर ग्रामसभेच्या ठरावाच्या पुढचे पाऊल टाकून सर्व विधवांना राहत्या घरात आणि जिथे असेल तिथे जमिनीत हक्काचा हिस्सा मिळायला हवा. ज्या नाशिकमध्ये विधवांच्या सन्मानासाठी कार्यशाळा झाली, त्याच नाशिक जिल्ह्यात चांदवड येथे अभूतपूर्व महिला अधिवेशन घेऊन शरद जोशी यांनी 'लक्ष्मी मुक्ती आंदोलन' पुकारले होते. विधवा सन्मान हे मुळात स्त्रीमुक्तीचे एक पाऊल आहे. त्यासाठी, सगळ्याच महिलांनी एकजूट करून पुढे यायला हवे. चांदवडनंतर साडेतीन दशकांनी पुन्हा 'लक्ष्मी मुक्ती'चे नवे आंदोलन उभे राहते आहे. तिचे सक्रिय स्वागत करायला हवे.

# बाळासाहेब आंबेडकर यांचे वाढदिवसानिमित्त कर्जतमध्ये ऐतिहासिक उपक्रम मोफत पेट्रोल वाटप

**दै.रायगड नगरी । कर्जत**

बहुजनांचे नेते बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर यांचे वाढदिवसानिमित्त कर्जत मध्ये दहिवली येथील पेट्रोल पंपावर धर्मेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली मोफत पेट्रोल पंपावार शेकडो सर्वसामान्य नागरिकांना मोफत पेट्रोल वाटप करण्यात आले.

सर्वसामान्य जनता पेट्रोलच्या वाढत्या दरामुळे त्रासलेली आहे. त्यांना महागाई पासुन मुक्तता पाहिजे अशा भावना व्यक्त केल्या जात आहेत. कर्जतमध्ये पहिल्यांदाच असा उपक्रम राबविल्या बद्दल नागरीकांनी कौतुक केले. धर्मेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली पेट्रोल पंपावार शेकडो सर्वसामान्य नागरिकांना मोफत पेट्रोल वाटप करण्यात आले.


याप्रसंगी रायगड जिल्हा उपाध्यक्ष हरिश्चंद्र यादव, जिल्हा संघटक सुनील गायकवाड, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अनिल गवळे,सुनील सोनावणे,शहर अध्यक्ष लोकेश यादव, तालुका उपाध्यक्ष गणेश मोरे,तालुका सचिव प्रदिप ढोले, युवा सचिव प्रदिप गायकवाड,अशोक कदम,कमलाकर जाधव,रोषण शिंदे,अजय जाधव,जगदीश गायकवाड,शरद गायकवाड आदी उपस्थित होते.

# रायगड जिल्हा पोलीस व स्वदेस फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने पोलीस पाटलांचा क्षमता बांधणी कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्हा पोलीस व स्वदेस फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने डिजिटल स्वदेस उपक्रमांतर्गत कृषी विभाग, डीबीटी (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर) योजना या विषयावर झूम मीटिंगच्या माध्यमामधून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले व माणगाव तालुका कृषी अधिकारी रवींद्र पवार यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी स्वदेस फाउंडेशनचे उपसंचालक तुषार इनामदार, सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी व जिल्ह्यातील सर्व पोलीस पाटील उपस्थित होते. पोलीस पाटलांचा क्षमता बांधणी कार्यक्रम वर्षभर सुरू राहणार असून त्यामध्ये शासकीय योजना, नाविन्यपूर्ण उपक्रम व विविध विषयांवर प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेला अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या पुढाकाराने व पोलीस निरीक्षक श्री.केरूभाऊ कोल्हे यांच्या सहकार्याने व स्वदेस फाउंडेशन यांच्या वतीने मार्गदर्शन करण्यात येणार आहे.






राष्ट्रीय कुटुंब लाभ अर्थसहाय्य योजनेअंतर्गत घोडशेतवाडी शिरसाड येथील सुरेखा नथूराम कदम यांना आमदार भरतशेठ गोगावले यांच्या हस्ते वीस हजार रुपयाचा धनादेश तहशिल कार्यालय माणगाव येथे सुपूर्द करण्यात आला. त्यावेळी गणेश समेळ, अनिल मोरे, नायब तहसीलदार श्री. भाबड, संतोष जाधव आदी उपस्थित होते. (छाया : पद्माकर उभारे)

# धानकान्हे येथे शेतकरी मेळावा उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

शेतकरी सभा रोहे तालुका संघटनेचे वतीने तालुक्यातील धानकान्हे येथे आयोजित करण्यात आलेला. शेतकरी मेळावा उत्साही वातावरणात संपन्न करण्यात आला.

देवकान्हे ग्रा.पं.सदस्य दयाराम भोईर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या मेळाव्याप्रसंगीं शेतकरी सभा नेते काँ.रमेश ठाकूर, कामगार नेते काँ. अँड.विजय पाटील, शेतकरी नेते का.विजय मोहिते, व्हि.टी.देशमुख, उस्मान रोहेकर, जयवंत पोकळे, बाबूराव बामणे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभणार असून यावेळी शेतकरी सभा रोहे तालुक्याचे अध्यक्ष मधुकर सानप, उपाध्यक्ष शांताराम जाधव, सचिव सावित्रीबाई जगताप, मिलिंद पवार, सल्लागार राजेंद्र करवल, महिला विभाग सहसचिव साक्षी मोरे, खजिनदार राजेंद्र वाघमारे, गणेश म्हसकर यांच्यासह जगदिश



जाधव, विश्वनाथ जाधव, प्रतिक्षा पडवल, मोहन ठाकूर, गुणाजी कोकळे, शंकर धनावडे, तुकाराम जाधव, सखाराम कचरे, अमित पडवळ, अँड.प्रविण दाभाडे, कायदेशीर सल्लागार जानकी कुळकर्णी, अँड. शंकर हरपाल आदी पदाधिकारी यांच्यासह सर्वश्री शंकर धनावडे, वसंत मरवडे, शंकर धनावडे, महादेव जाधव, धोंडू कचरे, पांडुरंग गोसावी, रामचंद्र मरवडे, बाळा भोईर, गणेश माटल, विश्वास राऊत, सहदेव बाईत आदी प्रमुख क्रुषीनिष्ठ शेतक-यांसह मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.

सदरच्या मेळाव्यात शेतकरी वर्गाच्या ज्वंलत व प्रलंबित मागण्यांसाठीसर्वानुमते चर्चा करण्यात आली. तर शेतकरी सभा नेते काँ.रमेश ठाकूर, कामगार नेते काँ.अँड.विजय पाटील, बाबूराव बामणे, डॉ. पुजा पाटील यांनी मेळाव्यात मार्गदर्शन केले. या मेळाव्याचे सुत्रसंचलन नंदकुमार मरवडे यांनी केले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पांडवकडा धबधबा पर्यटन विकास आराखडा तयार करा : ना.आदिती तटकरे

पूर्ण करण्यात येणार आहे. यातील पहिल्या ४ टप्प्यांच्या माध्यमातून मूलभूत सुविधा उभ्या करणे व बांधकाम पूर्ण केले जाणार आहे. तर पाचव्या टप्प्यात राज्य शासन आणि बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (बीएनएचएस) यांच्यात सामंजस्य करार होईल. त्यानंतर या केंद्राचे संचलन बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी यांच्याकडे जाईल. हे केंद्र अस्तित्वात आल्यास जैवविविधता आणि पक्षीनिरिक्षणाची युवकांना संधी मिळेल, अशी अपेक्षा डॉ. सलीम अली यांचे नातलग डॉ. मुराद फते अली यांनी व्यक्त केली. यावेळी देवेंद्र बावधने, राहुल खोत उपस्थित होते. यावेळी बीएनएचएसचे सदस्य बीट्टू सहगल ऑनलाईनच्या माध्यमातून सहभागी झाले.

अलिबागच्या आदीवासी मुलांसाठी थलेटीक्स अणि तिरंदाजी प्रतिभा ओळखीच्या प्रस्तावाबाबत डॉप्ट स्पोर्ट क्लबची सादरीकरणाबाबत दालनात बैठक झाली. यावेळी रायगड जिल्ह्यातील आदीवासी समाजातील मुलांमधील खेळातील प्रतिभा शोधून त्यांना चांगल्या सुविधा देता येतील अशी भूमिका डॉप्ट स्पोर्ट क्लबने मांडली.

अलिबागपेक्षा सुधागड, कर्जत तालुक्यात अधिक आदिवासी समाज आहे त्या ठिकाणी क्लबने चाचण्या घ्याव्यात अशा सूचना दिल्या. आदीवासी मुलांमधील टॅलेंट हंट ते नर्चरिंगपर्यंत पाठपुरावा करा, असे निर्देश रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांना दिले. ते ऑनलाईन बैठकीत सहभागी झाले होते. यावेळी क्रीडा विभागाचे उपसचिव समीर सावंत, डॉप्ट स्पोर्टचे दर्शन वाघ, अभिजीत कुलकर्णी यांनी प्रकल्पाबाबतची माहिती सादर केली.

## विस्तारणाऱ्या उरणला ओढावणार भविष्यात पाणी टंचाईचे संकट

जवळच नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व शिवडी – न्हावा सेतू ( सिलींग) लवकरच उद्यास येत असल्याने या परिसराचा विकास साधण्यासाठी सिडकोने पुढाकार घेतला आहे. त्यामुळे भविष्याचा विचार करता, येत्या पाच,दहा वर्षांत या तालुक्यातील लोकसंख्या ही दुपटीने, तिपटीने वाढणार आहे. तसेच प्रकल्पही जोमाने वाढणार आहेत.त्यासाठी पाण्याची गरजही भासणार आहे.१० वर्षांपूर्वी तत्कालीन पालकमंत्री सुनील तटकरे यांच्या कार्यकाळात उरणला पाणी पुरवठा करणाऱ्या रानसई धरणांच्या पाणलोट क्षेत्रात वाढ करण्यासाठी धरणांच्या बंधाऱ्याची उंची वाढवावी असा निर्णय घेण्यात आला होता.परंतु त्याची अंमलबजावणी आजतागायत झालेली नाही. उरण तालुक्यातील रानसई व पुनाडे धरणातील पाणीसाठ्याची पातली ही एप्रिल महिन्यातच घटत असल्याने या परिसरातील नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.एकंदरीत सध्याचे जलस्रोत अपुरे पडत आहेत.त्यासाठी नवीन जलस्रोत तयार करणे ही काळाची गरज आहे.त्यामुळे उरणचे आमदार महेश बालदी, जिल्ह्याच्या पालकमंत्री अदितीताई तटकरे यांनी रानसई धरणाची उंची वाढवण्यासाठी व पुनाडे धरणाची गळती थांबविण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. न पेक्षा भविष्यात उरणकराची पाण्याची तहान भागविणारे जलस्रोत अपुरे पडतील,यात शंका नाही.

एम आय डी सीचे उरणचे उप अभियंता रविंद्र चौधरी यांच्याशी वारंवार मोबाईल व्दारे रानसई धरणातील पाणीसाठा व प्रकल्पांना, रहिवाशांना करण्यात येत असलेल्या पाणीपुरवठ्या संदर्भात माहिती घेण्यासाठी संपर्क साधला असता त्यांनी बोलण्यास नकार दर्शविला आहे.त्यामुळे पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करण्यासाठी उप अभियंता रविंद्र चौधरी यांना किती आस आहे.हे दिसून येत आहे.

## पेण येथील तलाठी भवन इमारतीसाठी ५० लाख रुपये निधी देणार : खा.सुनील तटकरे

तरतूद करून उपलब्ध करून देण्यात येईल. खा.सुनिल तटकरे यांच्या हस्ते सदर नियोजित इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले. या ईमारतीचे काम आमदार अनिकेत तटकरे यांच्या स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत निधीतून करण्यात येणार आहे. परंतु सदरचा निधी कमी पडणार असल्याने खासदार निधीतूनही मदत करण्यात येणार असल्याचे सांगितले. या भूमिपूजन सोहळ्याला रायगड जिल्हा तलाठी संघाचे अध्यक्ष संतोष जांभळे, माजी तहसिलदार बाबूराव निंबाळकर, सरचिटणीस वल्लभ मसके, सर्कल सूर्यवंशी, तलाठी सुरेंद्र ठाकूर, विलास म्हात्रे, विधानसभा अध्यक्ष नरेंद्र ठाकूर, तालुकाध्यक्ष दयानंद भगत, माजी नगराध्यक्ष संतोष शृंगारपुरे, शहर अध्यक्ष जितेंद्र ठाकूर, नगरसेवक निवृत्ती पाटील, नगरसेविका वसुधा पाटील, विकास म्हात्रे यांच्यासह मान्यवर व जिल्हयातील तलाठी, सर्कल, कोतवाल आदी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

## अखेर पावसाळ्यात वाकण पाली खोपोली राज्य महामार्गावरून विनाविघ्न प्रवास

सचिव वीरकर आणि शेतकरी यांचे सहकार्य लाभले. पाली अंबा नदीवरील एक पूल पावसाळ्यापूर्वी पूर्ण होईल. त्यानंतर जुना पूल तोडण्यास घेतला जाईल. दुसरा नवा पूल नोव्हेंबर पर्यंत पूर्ण होईल. १५ जून पर्यंत जांभूळपाडा अंबा नदीवरील दुसऱ्या नवीन पुलाचे काम देखील पूर्ण होईल. भालगुल येथील दोन्ही पूल झाले आहेत. फक्त एक बाजूचे प्रवेशाचे काम बाकी आहे. स्थानिक शेतकऱ्यांनी सहकार्य केल्यास तेही काम पूर्ण होईल. परिणामी या मार्गावरून पावसाळ्यात वाहतूक सुरळीत होईल. असे एमएसआरडीसी उपअभियंता सचिन निफाडे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

वाकण पाली खोपोली राज्य महामार्ग पुणे मुंबई वरून खोपोलीमार्गे कोकणाकडे जाण्यासाठी वाहतूक व प्रवासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. हा मार्ग मुंबई-गोवा महामार्गाला पर्याय मानला जातो. तसेच मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई बेंगलोर महामार्ग व मुंबई-गोवा महामार्गाला जोडतो. त्याच बरोबर येथून विळे मार्गे पुणे आणि माणगावला ही जाता येते. त्यामुळे मुंबई पुणे तसेच कोकणासाठी हा मार्ग महत्त्वाचा आहे. परिणामी हे तिन्ही पूल पूर्ण झाल्यास येथील वाहतूक सुरळीत होईल.

पाली, जांभूळपाडा व भालगुल या ठिकाणी तब्बल २५ कोटींच्या निधीतून अधिक क्षमता, रुंदी आणि उंचीचे पूल तयार होत आहेत. पाली अंबा नदीवरील नवीन पुलांची रुंदी १६ मीटर आहे. तर लांबी ११० मीटर तसेच जांभूळपाडा पूलांची रुंदी १६ मीटर, लांबी ७० मीटर इतकी आहे. भालगूल पूलांची रुंदी देखील १६ मीटर तर लांबी ५५ मीटर आहे. हे तिन्ही पूल चार लेनचे होणार आहेत. त्यांची भार पेलण्याची क्षमता ७५ टन आहे.

## श्रीवर्धन तालुक्यात देखभाल व दुरुस्तीच्या नावाखाली अघोषित भारनियमन सुरू

काही रक्कम घेतली जाते. डिपॉझिटची रक्कम महावितरण कडे जमा असताना त्यानंतर देखील महावितरणने अनेक वेळा सिक्युरिटी डिपॉजिट च्या नावाखाली ग्राहकांकडून डिपॉझिट वसूल केले आहे. परंतु एप्रिल महिन्याच्या वीज बिला बरोबर पुन्हा एकदा महावितरणने अनेक वीज ग्राहकांना सिक्युरिटी डिपॉझिटची बिले पाठवली आहेत. कोरोना महामारीत बंद असलेले उद्योगधंदे, अनेकजणांच्या गेलेल्या नोकऱ्या त्याचप्रमाणे कोणताही कामधंदा नसताना अनेक जण बेकारीच्या टांगत्या तलवारीवर असताना महावितरणने सिक्युरिटी डिपॉझिटच्या रकमांची बिल देऊन वीज ग्राहकांना शॉक दिल्याचे दिसत आहे. तरी महावितरणने या सिक्युरिटी डिपॉजिट बिलाच्या बाबत योग्य तो खुलासा करावा अशी मागणी वीज ग्राहकांकडुन केली जात आहे.

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरीता संपादित होणाऱ्या जमिनीच्या साडेबावीस टक्के योजनेंतर्गत वाटप करण्यात आलेल्या मौजे-कुंन्डेवहाळ निवाडा युनिट क्रमांक ११ मधील सर्व्हे नंबर १२/३, १२/४ हि जमीन खातेदार धोंडू गुंजा वासकर यांच्याकडून संपादित झालेली आहे. या मिळकतीपोटी त्यांना पुष्पक नोड येथील भूखंड क्रमांक-२५४, सेक्टर-३, क्षेत्र-२३०.०० चौ.मी. चे वाटपपत्र देण्यात आलेले आहे.

आता खातेदार धोंडू गुंजा वासकर यांनी त्यांचा वाटपित झालेला पुष्पक नोड येथील भूखंड क्रमांक - २५४, सेक्टर-३, क्षेत्र-२३०.०० चौ.मी. या भूखंडाबाबत दोन हक्कसोड सादर केले आहे.

दुय्यम निबंधक पनवेल नोंदणी क्रमांक-पवल-५-२३०३-२०२२ दिनांक १०.०२.२०२२ यांच्याकडील नोंदणीकृत केलेले हक्कसोडपत्र सादर केले असून सदरील हक्कसोडपत्रात नमूद केल्यानूसार त्यांना वाटपित झालेल्या भूखंडाबाबत खालील खातेदारांच्या लाभात हक्कसोडले आहेत.

उक्त दुय्यम निबधंक पनवेल येथील नोंदणीकृत विनामोबदला हक्कसोडपत्रामध्ये नमुद केल्यानुसार खालील खातेदारांनी त्यांना वाटप झालेल्या भूखंडाचे हक्क १ खातेदारांच्या लाभात सोडले आहेत ते खातेदार पुढील प्रमाणे

| अ.क्र. | वारस दाखल्यानुसार हक्कसोडपत्र लिहून देणार (i) | निवाड्यातील जाहीर खातेदार हक्कसोडपत्र लिहून घेणार (ii) |
|---|---|---|
| १. | रामू धोंडू वासकर | भावना सुनील भोईर |
| २. | राजेश धोंडू वासकर | |
| ३. | शेखर धोंडू वासकर | |
| ४. | रंजना शांताराम ठाकूर | |
| ५. | मथुरा सुनिल भोईर | |
| ६. | अलका मदन पाटील | |
| ७. | सुरेखा मदन पाटील | |
| ८. | जागृती धोंडू वासकर | |
| ९. | ज्योती मिलींद मढवी | |

उपरोक्त हक्कसोडपत्रानुसार केवळ टेबल क्र. (ii) मध्ये नमूद केलेली व्यक्तीच सदरील भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरु शकते. हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपीत भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नावे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यांत आलेले आहेत अशा व्यक्तीच्या नावे सिडकोकडून भूखंडाचे भाड्डेपट्टा करारनामा करुन भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसानंतर कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

दुय्यम निबंधक पनवेल नोंदणी क्रमांक-पवल-५-२३०५-२०२२ दिनांक १०.०२.२०२२ यांच्याकडील नोंदणीकृत केलेले हक्कसोडपत्र सादर केले असून सदरील हक्कसोडपत्रात नमूद केल्यानुसार त्यांना वाटपीत झालेल्या भूखंडाबाबत खालील खातेदारांच्या लाभात हक्कसोडले आहेत.

उक्त दुय्यम निबधंक पनवेल येथील नोदंणीकृत विनामोबदला हक्कसोडपत्रामध्ये नमुद केल्यानुसार खालील खातेदारांनी त्यांना वाटप झालेल्या भूखंडाचे हक्क १ खातेदारांच्या लाभात सोडले आहेत ते खातेदार पुढील प्रमाणे

| अ.क्र. | निवाड्यातील जाहीर खातेदार हक्कसोडपत्र लिहून देणार (i) | निवाड्यातील जाहीर खातेदार हक्कसोडपत्र लिहून घेणार (ii) |
|---|---|---|
| १. | ज्ञानेश्वर नामा वासकर | भावना सुनील भोईर |
| २. | सचिन नामा वासकर | |
| ३. | नितीन नामा वासकर | |

उपरोक्त हक्कसोडपत्रानुसार केवळ टेबल क्र. (ii) मध्ये नमुद केलेली व्यक्तीच सदरील भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरु शकते. हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नावे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत अशा व्यक्तीच्या नावे सिडकोकडून भूखंडाचे भाड्डेपट्टा करारनामा करुन भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसानंतर कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

तरी वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत / तक्रार असेल तर त्यांनी **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि), तळमजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत / तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यांत येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (विमानतळ)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०६४/२०२२-२३

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## खांदेश्वर रेल्वे स्टेशन ते खांदा कॉलनी नवीन पनवेल या मार्गावर बस सेवा सुरू करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खांदा कॉलनी ते खांदेश्वर रेल्वे स्टेशन जाणाऱ्या प्रवासाची सख्या ५,००० आधिक आहे तसेच या भागात रिक्षा मीटर प्रमाणे सुरू नसल्याने प्रवास खूप महाग झाला आहे. शिवाय खांदेश्वर रेल्वे स्टेशन परिसरात पार्किगसाठी जागा उपलब्ध नसल्याने स्वतःची गाडी असूनही रिक्षा वर अवलंबून राहावे लागते. पेट्रोल –डिझेल च्या वाढत्या किंमती मुळे प्रवास महागला आहे. खांदा कॉलनी नवीन पनवेल मधील बस सेवा परत सुरु करावी यासाठी नवी मुंबई महानगरपालिका परिवहन मंडळचे व्यवस्थापकाना अखिल भारतीय छावा संघटना संघटना निवेदन दिले.

यावेळी अखिल भारतीय छावा संघटना रायगड जिल्हा अध्यक्ष प्रसाद परब, पनवेल अध्यक्ष प्रविण जठार, शशी नायर आणि महिला संघटक सुमती सरगर उपस्थित होते. आधी सुरु असलेले ५९ नंबर ची बस पुन्हा सुरु करण्याचे आश्वासन नवीमुंबई परिवहनच्यावतीने देण्यात आले. बस मार्गा , पनवेल रेल्वेस्थानक पासून अभ्युदय बँक, बांठिया विद्यालय, कालिकामाता मंदिर, अयप्पा मंदिर, तेरणा हॉस्पिटल, आदई सर्कल, शिवम आर्किट, तलाव, सूर्यदर्शन सोसायटी, आदई फाटा, डॉ.आंबेडकर उड्डाणपूल, पेट्रोल पंप, आयकर ऑफिस, मोठा खांदा, ते खांदेश्वर रेल्वेस्थानका पर्यंत असेल.

## नागोठण्यात दुसऱ्या कीर्तन महोत्सवाचे १७ मे ला आयोजन

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

सद्गुरू श्री गणपतबाबा अलिबागकर महाराज प्रेमवर्धक वारकरी सांप्रदाय, स्वानंद सुख निवासी सद्गुरू स्वामी गणेशनाथ महाराज सांप्रदाय व आदिनाथ नामधारक सांप्रदाय यांच्या आशीर्वादाने चाळीसगाव वारकरी सांप्रदाय, नागोठणे विभाग यांच्या वतीने नागोठण्याची ग्रामदेवता श्री जोगेश्वरी मातेच्या प्रांगणात १७ व १८ मे, २०२२ रोजी दुस–या कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती चाळीसगाव वारकरी सांप्रदायाचे संस्थापक ह.भ.प. रायगड भूषण दळवी गुरुजी यांनी दिली.

या कीर्तन महोत्सवात ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरीच्या ९ व्या व १२ व्या अध्यायाचे पारायण, अखंड हरीनाम तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या कीर्तन महोत्सवाची सुरुवात मंगळवारी (दि.१७) सकाळी नऊ वाजता मंगल पूजनाने होणार आहे. त्यानंतर दीप प्रज्वलन, मंगल पूजन, कलश पूजन, ध्वजारोहण, वीणा पूजन, श्री ज्ञानेश्वरी पूजन, नंतर श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाचे वाचन, सायंकाळी नागोठणे विभागातील चाळीसगाव वारकरी सांप्रदायाचे सामुदायिक हरिपाठ व रात्री ७ वाजता जळगाव येथील प्रसिद्ध कीर्तनकार खानदेश्वररत्न ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली जळकेकर यांचे कीर्तन व त्यानंतर हरी जागर होणार आहे.

या कीर्तन महोत्सवाचा समारोप बुधवार दि. १८ मे रोजी सकाळी दहा वाजता वाणीभुषण, भिवंडी येथील ह.भ.प. जगन्नाथ महाराज पाटील यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार असल्याचे आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# रॉकेल मिळेना आणि लाकूड फाटा परवडेना ; इंधन दरवाढीमुळे चुलीचा आधार

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

घरगुती सिलेंडरचे दर हजार रुपयांवर पोहचले आहेत. त्यातच शासनाने रॉकेल पुरवठा देखील बंद केला आहे. यामुळे जिल्ह्यात निमशहरी व ग्रामीण भागातील चुलीचा थोडा आधार आहे. मात्र लाकूड फाटा देखील महागल्यामुळे चूल देखील कशी पेटवणार आणि जेवण सुद्धा शिजवायचे कशावर असा प्रश्न महिलांना पडला आहे. मागील वर्षी शंभर रुपयांना मिळणारी लाकडाची एक मोळी आता २०० ते १५० रुपयांना मिळत आहे. त्यामुळे एकूणच इंधन दरवाढीमुळे सर्वसामान्य व ग्रामीण भागातील लोकांचे जगणे मुस्किल झाले आहे.



सिलेंडरचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यामुळे ते सर्वसामान्यांना देखील परवडेनासे झाले आहेत. ग्रामीण भागात आणि आदिवासी वाड्यापाड्यांवर तर आणखी गंभीर परिस्थिती आहेत. अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद दिल्ली संलग्न चे कोकण संघटक व सुधागड तालुक्यातील आदिवासी नेते रमेश पवार यांनी सांगितले की गॅस घेणे गरीब व हातावर पोट असलेल्यांना शक्य नाही. उज्वला योजनेचा लाभ घेतलेले लाभार्थी देखील गॅस सिलेंडर घ्यायला पैसे नसल्याने आता चुलीवर अन्न शिजवीत आहेत. कोरोना महामारी अनेकांचा रोजगार हिरावला आहे आणि इंधन भावाढीमुळे लोकांच्या खाण्याचे वांदे झाले आहेत असे रमेश पवार यांनी सांगितले. सिलेंडर वरील सबसिडी बंद झाल्याने ग्राहकांवर अतिरिक्त भार पडत आहे. त्यामुळे सिलेंडर घेणे परवडत नाही.

काही ठिकाणी रेशनवर मिळणारे रॉकेल बंद असल्याने लोकांची खूप गैरसोय होत आहे. रॉकेलचा काळाबाजार होतांना दिसत आहे. काही ठिकाणी रॉकेल तब्बल ७० ते ८० रुपये लीटरने मिळत आहे.

मग एवढ्या चढ्या भावात खरेदी करणे सर्वमान्य नागरिक व ग्रामीण भागातील लोकांना परवडत नाही. त्यामुळे शासनाप्रती त्यांच्या मनात असंतोष निर्माण झाला आहे.

सिलेंडर महागले, रॉकेल मिळत नाही, लाकूडफाट्यासाठी रानात उन्हाची वणवण करावी लागते. तो सुद्धा मुबलक मिळत नाही. आणि विकत घेणे परवडत नाही. शासनाने गोरगरिबांचा विचार केला पाहिजे. असे सुधागड तालुक्यातील लक्ष्मी वाघमारे या महिलेने सांगितले. रेशनवर गहू तांदूळ भेटतात पण जेवण बनवायचे कशावर हा प्रश्न आहे. रॉकेल बंद झाले आहे. एवढा महाग गॅस सिलेंडर घेणार कसा? त्यामुळे खूप जगणं मुस्किल झाले आहे. असे ताई पवार या महिलेने डोळ्याच्या कडा पुसत सांगितले.

## कर्जतमध्ये खाजगी क्लासेस सोबत जॉइंट व्हेंचरमध्ये सुरू केलेले व्यवसाय त्वरीत बंद करावेत : ॲड.कैलास मोरे

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील संस्था/शाळांनी शाळेच्या आवारात खाजगी क्लासेस सोबत जॉइंट व्हेंचरमध्ये सुरू केलेले व्यवसाय त्वरीत बंद करावेत अशी मागणी अँड.कैलास मोरे यांनी केली आहे, अशा संस्थांवर शिक्षणाधिकारी यांनी त्वरीत कारवाई करावी.

कर्जत तालुक्यात अनेक शाळा/कॉलेज हे शासनाकडून अनुदान घेऊन चालत आहेत. शासनाने वेळोवेळी आदेश काढुन शासनाकडुन पगार घेत असलेल्या शिक्षकांना खाजगी शिकवणी घेण्यास मनाई केली आहे.

यामध्ये अजुन भर म्हणजे तालुक्यातील अनेक संस्थांनी खाजगी क्लासेस बरोबर भागीदारी करुन शाळेच्या परिसरातचं खाजगी क्लासेस सुरू केले आहेत. सदरचा प्रकार म्हणजे शिक्षणाचं बाजारीकरण करायला घेतले आहे.

संस्था एकीकडे शासनाकडून अनुदान घेत आहेत त्यात विदयार्थ्यांकडुन वारेमाप इमारत निधिच्या नावाखाली दरवर्षी फीज घेतात. गोरगरीब विदयार्थ्यांकडुन सुद्धा इमारत निधि घेतली जाते. अशा इमारती संस्थाना खाजगी क्लासेसना वापरणेसाठी देण्याचा अधिकार कुणी दिला? संस्था/ शाळा, खाजगी क्लासेस बरोबर जॉईट व्हेंचर मध्ये क्लासेस चालविण्याचा धंदा करणार असतील तर अशा संस्थांनी शाळा बंद करून खाजगी क्लासेसचं सुरू करावेत.

शाळेच्या परिसरात खाजगी क्लासेस सुरु करून शाळेतल्या विद्यार्थ्यांना जबरदस्ती करुन खाजगी क्लासेस मध्ये प्रवेश घेयाला लावुन एक नवीन पायंडा पाडला जात आहे. सदरची बाब म्हणजे विद्यार्थ्यांवर अन्यायकारक अशी आहे. तसेच अशा प्रकारे संस्थांनी खाजगी क्लासेस बरोबर व्यवसाय करणे म्हणजे शिक्षणाचं उघडपणे बाजारीकरण करणे होय. तालुक्यातील अशा संस्था/ शाळांवर शिक्षणाधिकारी यांनी त्वरीत कारवाई करावी अशी मागणी सम्यक विद्यार्थी आंदोलन मार्फत करण्यात आली आहे.

## महादेव नारायण गायकर यांना रयत सेवक पुरस्कार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्यामार्फत सन २०२१–२०२२ मध्ये देण्यात येणारा माजी प्राचार्य एन आर माने निष्ठावंत गुणी रयत सेवक पुरस्कार २०२२ हा परशुराम म्हात्रे विद्यालय नावडेचे शिपाई महादेव नारायण गायकर यांना यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स सातारा येथे रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन अनिल पाटील यांच्या हस्ते व मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव प्रिन्सिपल विठ्ठलराव शिवणकर व सहसचिव संजय नागपुरे, मध्य विभाग विभागीय अध्यक्ष महादेव मोहिते, रायगड विभागीय अधिकारी आर.पी. ठाकूर व सहाय्यक विभागीय अधिकारी एस .एस .फडतरे उपस्थित होते . महादेव गायकर हे अनेक वर्षापासून शालेय कामकाज सांभाळून शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रामध्ये काम करत आहेत. त्यांच्या या योगदानाने त्यांना अनेक सामाजिक संस्थेमार्फत अनेक पुरस्काराने गौरवण्यात आले आहे .त्यांच्या या कार्याची दखल घेत रयत शिक्षण संस्था मार्फत देण्यात येणारा माजी प्राचार्य एम.आर. माने निष्ठावंत गुणी रयत सेवक पुरस्कार २०२२ देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आलेला आहे. आशिया खंडातील नामांकित रयत शिक्षण संस्थेमार्फत मिळालेल्या ह्या पुरस्काराबद्दल त्यांचे समाजातील अनेक स्तरातून कौतुक केले जात आहे.

## पावसाचे संकेत जाळ्यात आढळतात गाभोळी मासे, ढगाळ वातावरण तापमानात घट

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

मंगळवार दि. १० मे रोजी सकाळ पासुनच पाऊस पडेल असे वातावरण असुन गेले दोन दिवस उन सावलीचा खेळ आणि अधुन मधुन वारे वाहत आहेत. भर दुपारच्या सुमारास जो पारा गेले आठवडाभर ४३ अंश सेल्सियस पर्यंत पोहचला होता, तो आता ४० अंश सेल्सियस च्या खाली आला आणि आज तापमान ३७ अंश सेल्सियस नोंदवीले गेले. कमी जास्त उष्णता आणि थंडगार पेय पिण्यामुळे नागरिकांना किरकोळ सर्दी, खोकला,डोकेदुखी अशा आजारांचा सामना करावा लागत आहे. यंदा पाऊस लवकर सुरु होईल असे भाकित सर्वच जण वर्तवित आहेत.

अगदी निसर्गातील बहावा, गुलमोहर वृक्ष यांचा बहर नजरेत भरत आहे. तसेच नदीवर मासेमारी करणाऱ्या काही मासेमारांचे म्हणण्यानुसार नदीतील अरले, मळ्याच्या माशांच्या पोटात चक्क अंडी तयार झाल्याचे आढळून येत आहे. पाऊस जवळ आला कि गाभोळी मासे जाळ्यात भेटायला सुरुवात होत असते. भरपूर पाऊस आणि नदीला पाणी वाढले कि मासे गढ्ळ पाण्यात अंडी सोडतात. गाभोळी (अंडी भरलेले) वल्गनीचे मासे म्हणजे खवय्यांना खास मेजवाणीच काळ असतो.





## ज्येष्ठ शिवसैनिक परशुराम घरत यांचे निधन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जेष्ठ शिवसैनिक परशुराम हरिश्चंद्र घरत ( वय ६८) यांचे कळंबोली येथे अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्यावर रोडपाली येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

कळंबोली वसाहतीमधील ते पहिले शिवसेनेचे शाखा प्रमुख होते. गेले काही दिवस ते आजारी होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, मुलगा, सून व नातवंडे असा परिवार आहे. ते दीपक घरत यांचे वडील होते.

### PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given to the public at large my client Mrs.Asiya Didar Shaikh has lost / misplaced the 'Original Share Certificate' of Flat bearing No.B 401, 4 th Floor, admeasuring area about-1068 Sq. ft. Carpet, in the building known as 'HARD ROCK' Co-Opertive Housing Society Limited, at Plots No.6, 7, 8, 9 & 10, Sector-07, Kharghar, Navi Mumbai, Taluka-Panvel, District-Raigad, Pin-410210, comprising of 05 fully paid-up shares each, bearing distinctive numbered from 266 to 270 (Both inclusive) of Rs.50/- (Rupees fifty only) each, issued by the said society under share certificate no.054, dated-03/07/2010, in the name of Mr.Dildar Rasool Shaikh & Mrs.Asiya Didar Shaikh has been lost.

It is humble request If any person/s found the said Share Certificate please return it to my office address or my clients residence address given above within 7 days from the date of publication hereof, otherwise the application for duplicate share certificate have to move to the said society by my client

My office address given herein below.

Place : Kharghar, Navi Mumbai
Date : 10/05/2022

**Sd/-**
**Adv.SUJATA JOTIBA PATIL**
**(Advocate High Court)**
**Office Add : Visava CHS, Plot No.E-124/13, Sector-12, Kharghar, Navi Mumbai-410210**
**Mob No.8879416483**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सुचना देण्यात येते की, माझे अशिल असिया दिलदार शेख राहणार : फ्लॅट नं.बी ४०१, हार्ड रॉक सोसायटी, प्लॉट नं.६ ते १०, सेक्टर ७, खारघर, नवी मुंबई, जिल्हा : रायगड यांच्या नावे खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे भाग प्रमाणपत्र शेअर्स सर्टीसफिकेट सभासद नोंदणी नं.५४ भाग नं.२६६ ते २७० त्यांच्या नकळत हरवले आहे व बराच शोध घेवून देखील त्यांना ते अद्यापपर्यंत मिळालेले नाही सदर मिळकतीचे वर्णन

**मालमत्तेचा तपशिल**
**बी ४०१, हार्ड रॉक सोसायटी, प्लॉट नं.६ ते १०, सेक्टर ७, खारघर, नवी मुंबई, जिल्हा : रायगड**
**शेअर्स सर्टीफिकेट नं.५४, भाग नं.२६६ ते २७०**

वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भातील भागप्रमाण नं.५४ भाग नं.२६६ ते २७० कोणाला सापडल्यास ते नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत दाखल करावे. तसे न झाल्यास ते कागदपत्र गहाळ समजण्यात येईल व त्या कागदपत्रासंदर्भात कोणाकडून बेकायदेशीर काम झाल्यास त्यासाठी माझे अशिल जबाबदार नसतील याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, से.१२, खारघर**
**मो.नं.८८७९४१६४८३**

अर्जदारातर्फे वकील
श्री.किरण बाळकृष्ण भगत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील ३ रे मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.पनवेल यांचे न्यायालयात
**फौ.चौ.अर्ज क्र.५५९/२०२२**
**ने.ता.१६/०६/२०२२**

सौ.वर्तीका गौरव कुलश्रेष्ठ
वय : ३८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.फ्लॅट नं.१०३, कोकण प्राईड, प्लॉट नं.११,
सेक्टर २०, रॅडक्लीफ स्कूल वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक/ग्रामपंचायत वहाळ
पत्ता : मु.पो.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्यापेक्षा सदर अर्जदार हिची मुलगी कु.रिद्धीका गौरव कुलश्रेष्ठ हिचा जन्म दि.२०/०४/२०१९ रोजी मेडीलाईफ हॉस्पिटल, साई रेसिडेन्सी, प्लॉट नं.१९२, रॅडक्लीफ स्कूल जवळ, सेक्टर २०, मौजे : वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे. सदर अर्जदाराने सदरील जन्माची नोंद होणेकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू अर्जदार हिची मुलगी कु.रिद्धीका गौरव कुलश्रेष्ठ हिचे वर नमूद ठिकाणी जन्म झाले आहे किंवा कसे? हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत, त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार हिचेकडून लागलीच पुरावा घेवून तीस सदरहू मुलीचे जन्माची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१० माहे मे सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, मौजे : उसर्लीबुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील प्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत श्री.बाळाराम वाळकू पाटील यांचे मालकीची आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : उसर्लीबुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड**

| भूमापन क्रं. | भूमापन क्रमांकाचा उपविभाग | भूधारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| ६१ | ४ | भो वर्ग २ | ०–११–०० | ०.२० |

उपरोक्त मिळकत आमचे अशिलाने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्रीचा करार, मक्ता, रस्ता वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, ट्रस्ट, इजमेंट, बोजा, मृत्यूपत्र, दान बक्षिस, अखत्यारपत्र, कुळहक्क इ. कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार वकील यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रर दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून सदर मिळकतीचा व्यवहार माझे अशिल पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ११/०५/२०२२

**सही/–**
**ॲड.विशाल दत्ता भोपी**
**वकील, उच्च न्यायालय**
**घर नं.२४३, सदाशांती निवास**
**आकुर्ली, मालेवाडी, ता.पनवेल,**
**जि.रायगड–४१०२०६**
**मो.नं.९०८२०३८९६०**

Adv. Meghana Nimbalkar

### PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.) Godse Saheb, PANVEL AT PANVEL

M.A.No.781/2022
Exh : 8/D
Next Date : 14/06/2022

1) Mr.Kripa Shankar Pandey
Age : 55 Years, Occupation :
2) Miss.Niharika Kripa Shankar Pandey
Age : 27 Years, Occupation :
Both R/at : Flat No. L-502,
Haware Splendor CHS, Plot No.56,
Sector-20, Kharghar 410210
3) Mr.Kaushal Kripa Shankar Pandey
Age : 30 Years, Occupation :
R/at : 800 W, Renner Road Apt No.3112,
Richardson, Texas 75080 USA. — Applicants

That Late Mrs.Sunita Pandey was the wife of Applicant no.1 & mother of Aapplicant no.2 & 3 who expired on 08/08/2013 at Mumbai. The Property Description Standing in The Name of Deceased is Attached Herewith.

**SCHEDULE OF PROPERTY 'A'**

**Name of the Property Holder : Late Mrs.Sunita Pandey & Mr.Kripa Shankar Pandey.**

**Flat No.L-502, on 5 th Floor, Haware Splendor CHS, Plot No.52 & 56, Sector-20, Kharghar 410210.**

**Agreement Value Rs.11,74,215/- (Rupees Eleven Lakhs Seventy-Four Thousand Two Hundred & Fifteen Only).**

**(For 50 % Share)**

Whereas the above-named applicant has filed present misc. application for heirship certificate under Bombay regulation VIII of 1827, the court of civil judge (S.D.) Panvel

You the members of public are hereby given notice to appear in the court of civil judge (S.D.) Panvel in person or by pleader duly instructed and to file your say / objection if any notice within 30 days from the date of publication of public notice, failing which the said application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under the hands and seal of the court this 6 Day of May 2022

| Sd/- Jr.Clerk Civil Judge (S.D.) Panvel | Court Seal | Sd/- Asstt.Superintent. Civil Judge (S.D.) Panvel |
|---|---|---|

### जाहीर नोटीस

न्यु उमा सहकारी गृहनिर्माण संस्था, मालमत्ता क्र.५६८/ड, पनवेल तर्फे सदर गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकासाच्या कामासाठी बांधकाम क्षेत्रातील (पुर्नविकास प्रकल्प व्यवस्थापक) प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंन्स्ट (PMC) म्हणून नेमणूक करावयाची आहे. हे काम करण्यात स्वारस्य असणाऱ्या अनुभवी कमीतकमी २० (वीस) वर्षे बांधकाम क्षेत्रातील तांत्रिक अनुभव असलेल्या कन्सल्टंन्स्ट व्यक्ती अथवा संस्था / कंपनीकडून यांचेकडून देकार मागविण्यात येत आहे. याकामी देकार स्वीकारण्याची अंतिम तारीख दि.१८/०५/२०२२ रोजी संध्याकाळी ७.०० P.M. वाजेपर्यंत असेल. या कामासाठी आलेले देकार स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे सर्व अधिकार हे गृहनिर्माण संस्था स्वतःकडे राखून ठेवत आहे.

स्थळ : पनवेल
दिनांक : ११/०५/२०२२

**सही/–**
**सचिव**
**न्यु उमा सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**मालमत्ता क्रं.५६८/ड, नवीन कोर्टाच्या जवळ,**
**लोखंडीपाडा, पनवेल, जि.रायगड–४१०२०६**
**मो.क्र.८१६९४९८७००/९३२४३७४८६८**

Adv. Meghana Nimbalkar

### PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.) Rao Saheb, PANVEL AT PANVEL

M.A.No.771/2022
Exh : 8/D
Next Date : 13/06/2022

Mr.Keshav Chander Bajaj
Age : 78 Years, Occupation : Retired
Residing at : W-503, Plot No.22, Sec-20
Jalvayu Vihar Defence Enclave 2 & 3 CHS
Ltd. Kharghar, Pincode-410210 — Applicant

That Late Shree.Satish Chander Bajaj was the brother of Applicant who expired on 24/02/2021 at Kamothe. The Property Description Standing in The Name of Deceased is Attached Herewith.

**SCHEDULE OF PROPERTY 'A'**

**Name of the Property Holder : Late Shree. Satish Chander Bajaj**

**Flat No.C-202, on 2 nd Floor, in the building known as Swarna Premises Co-operative Housing Society Limited, Plot No.13 & 14, Sector-7, Kharghar-410210, Taluka-Panvel, District-Raigad.**

**Agreement Value Rs.9,57,600/- (Rupees Nine Lakh Fifty-Seven Thousand & Six Hundred Only).**

Whereas the above-named applicant has filed present misc. application for heirship certificate under Bombay regulation VIII of 1827, the court of civil judge (S.D.) Panvel

You the members of public are hereby given notice to appear in the court of civil judge (S.D.) Panvel in person or by pleader duly instructed and to file your say / objection if any notice within 30 days from the date of publication of public notice, failing which the said application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under the hands and seal of the court this 9 Day of May 2022

| Sd/- Jr.Clerk Civil Judge (S.D.) Panvel | Court Seal | Sd/- Asstt.Superintent. Civil Judge (S.D.) Panvel |
|---|---|---|

# संक्षिप्त...

## महिलेच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणाऱ्या इसमा विरुद्ध गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मेंढ्या चारण्यासाठी घेऊन जात असलेल्या एका महिलेच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग करून सदर महिलेने आरोपीस धक्का दिला असता झालेल्या झटापटी मध्ये सदर महिलेच्या गळ्यातील डोरली तुटून नुकसान केल्या बद्दल सदर इसमा विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर महिला ही मेंढ्या चारण्यासाठी भिंगार गावाकडे जात असताना सांगडे गाव येथील वीटभट्टी जवळून चालत असतेवेळी सदर आरोपीने अंगावरील सर्व कपडे काढून सदर महिलेच्या जवळ येऊन तिला मिठी मारून तिच्या लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला व तो पळून गेल्याने तसेच त्याने यापूर्वी देखील तिचा पाठलाग केला होता. या संदर्भात सदर महिलेने पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

## वांगणी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी राष्ट्रवादीच्या शुभांगी जांबेकर

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील वांगणी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच रसिका मोरेश्वर तेलंगे यांनी स्थानिक पातळीवर झालेल्या तडजोडीनुसार त्यांचा नियोजित कालावधी संपल्यानंतर उपसरपंचपदाचा राजिनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंचपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमडोशी येथील ग्रा.पं.सदस्या सौ. शुभांगी एकनाथ जांबेकर यांची सोमवारी (दि.९) बिनविरोध निवड करण्यात आली.

रायगड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार सुनिलजी तटकरे यांच्या आशीर्वादाने तसेच रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना .कु.आदितीताई तटकरे व आ.अनिकेतभाई तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही बिनविरोध निवड करण्यात आली. ही निवड प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी वांगणीचे ग्रामसेवक अमोल तांबडे यांनी मोलाचे सहकार्य केले.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# कामोठ्यातील जीगरबाज होतकरू प्रकल्पग्रस्त युवकाचे हॉटेल व्यवसायात यशस्वी पाऊल

**दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार**

**पनवेल** : नवीमुंबईला लागुन असलेल्या कामोठ्यातील युवकाने आपल्या अफाट इच्छा शक्ती च्या जोरावर रायगड जिल्ह्यातील रेवदंडा कील्या जवळ हॉटेल व्यवसायात आपले मजबुत पाय रोवल्याने रमेश गोवारी यांचे सर्वच स्थरातुन अभिनंदन होत आहे.

रायगड जिल्ह्यातील रेवदंडा हे निसर्गाने नटलेले असे एक पर्यटनस्थळ आहे तेथे असलेला पुरातन कील्ला पहाण्याकरीता देश विदेशातील पर्यटकही अतीशय उत्सुकतेने येथे येत असतात अशाच अथांग सुंदर समुद्र कीनारी रेवदंडा कील्ला जवळ रमेश गोवारी या युवकाने अगदी समुद्राला लागुनच आई एकवीरा खाणावळ एक सुंदर असे हॉटेल सुरू केले आहे. या ठिकाणी चमचमीत लज्जतदार जेवणाचा समुद्र कीनारी बसुन निसर्गरम्य वातावरणात जेवणाचा आनंद घेण्यासाठी पुणे, मुंबई रायगड, नविमुंबई, ठाणे अशा विविध ठिकाणाहुन पर्यटकांचा ओघ दिवसेंदिवस वाढत असल्याचे रमेश गोवारी यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

ताजी मच्छी, रहाण्यासाठी टेंन्ट थंडगार हवा व आई एकवीरा खाणावळीतील विविध चमचमीत खाद्य पदार्थावर ताव मारण्याचा मनमुराद आनंद घेण्यासाठी त्याचबरोबर रेवदंडा येथील ऐतिहासिक कील्ला पहाण्याचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची रीघ लागलेली असते आई एकवीरा खाणावळ मध्ये ग्राहकांना सेफ व उत्तम सेवा या हॉटेलमध्ये मिळत असल्याने येथे आलेला पर्यटक पाहुणचार घेऊन जाताना आई एकवीरा खानावळ व येथील सोयी सुवीधाची मनापासुन प्रशंसा करतात व आपल्या घरी गेल्यावर मित्र परिवारांसोबत आपसुकच रेवदंडा फोर्ट येथील आई एकवीरा खानावळीची माऊथ पब्लीसीटी मनापासुन ईतरांसमोर करतात. नकळत यामुळे या हॉटेलच्या ग्राहकांत झपाट्याने वाढ होत आहे. त्याचबरोबर या खाणावळीत आलेल्या पर्यटकांना कील्ला परिसरातील माहीती रमेश गोवारी त्यांचे मित्र अक्षय शेणवईकर देत असतात. त्यातच बच्चे कंपनीला समुद्र किनारी घोडेस्वारी, घोडागाडी, बोटींग व ईतर विवीध खेळांचा दिलखुलास आनंद परीवारांसोबत घेता येत असल्याने तसेच समुद्राच्या कीनारी लाटांवर लाटांवर पोहण्याचा आनंदही येणारे पर्यटक घेत असतात.

नंतर पर्यटकांचे पाय वळतात ते आई एकवीरा खानावळ परीसरात अत्यंत सुंदर असे येथील वातावरण नारळ सुपारीच्या सान्निध्यात टेबलावर झकास आई एकवीराच्या खानावळीच्या जेवणाची चवच काहीशी भन्नाट असल्याने येथे काही चित्रपट क्षेत्राशी निगडीत असलेले कलावंत देखील मुव्ही करीता येत असतात. पर्यटक व आमचे नाते अगदी मैत्रीपुर्ण असल्याने नुकतेच दिग्दर्शक लेखक राज पैठणकर यांच्या गरम कीटली यांच्या पिक्चरचे येथे शुटींग्ज झाले.

यामध्ये सी.आय.डी मधील दयानंद शेट्टी, विजय पाटकर, विशाखा सुभेदार, अंशुमन विच–ारे आदी दिग्गज कलाकारांना घेऊन हा पिक्चर ऑगस्टमध्ये रीलीज होत असे दिग्दर्शक राज पैठणकर यांनी रमेश गोवारी यांच्याशी बातचीत दरम्यान सांगीतले. येथे रहाण्याकरीता उत्तम कॉटेजही असल्याचे पैठणकर यांनी नमुद केले. परतीच्या प्रवासावेळी आमच्या बरोबर निर्सगरम्य आई एकविरा खानावळ मध्ये मनमुराद फोटो सेशनही होते, असे गोवारी यांनी सांगितले. एकदा आलेला पर्यटक हा पुन्हा पुन्हा येथे नक्कीच भेट देतो. या हॉटेल व्यवसायायात माझ्या पत्नीचा व स्थानिक मित्र अक्षय शेणवईकर व अन्य मित्र परीवारानेही मला उत्तम साथ दिल्यानेच येथे मी हा व्यवसाय त्यांच्या सहकार्याने आज पर्यंत चांगल्या सुनियोजीतपणे करीत आहेत असे गोवारी यांनी अखेर स्पष्ट केले.

# पोलीस पाटील यांनी आपले कर्तव्य बजावताना सतर्क राहणे गरजेचे : शिवराज पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पोलीस पाटील हे खऱ्या अर्थाने त्या गा–वाचे पोलिसच असतात त्यामुळे त्यांनी आपले कर्तव्य बजावताना सतर्क राहणे गरजेचे आहे. गावात काय चाललंय याची माहिती वेळोवेळी घेऊन काही गोष्टी समाज विघातक असल्यास त्याची माहिती नजीकच्या पोलिसांना द्यावी असे आवाहन परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी आज पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मंथन सभागृह येथे घेतलेल्या पोलीस पाटलांच्या बैठकीत केले.

या बैठकीला परिमंडळ २ पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, यांच्यासह सहाय्यक पो–लीस आयुक्त भागवत सोनावणे, तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौडकर, पोलीस निरीक्षक अंकुश खेडकर, पोलीस उपनिरीक्षक उमेश गुटाळ, गोपनीय विभागाचे सचिन होळकर यांच्यासह तालुका हद्दीतील ३२ पोलीस पाटील उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी सांगितले की, पोलीस पाटलांनी सामाजिक भान ठेऊन काम करावे, कोणत्याही अवैध्य गोष्टी होत असल्यास त्याची माहिती पोलीस ठाण्यात द्यावी त्यामध्ये प्रामुख्याने शाळा, कॉलेज परिसरातील बेकायदेशीर गुटखा विक्री, मद्य विक्री, अंमली पदार्थांची विक्री, त्यामुळे तरुण पिढी नशेच्या आहारी जात आहे. तरी अश्या प्रकारच्या कृत्यांना वाव देऊ नये. गावात वातावरण बिघडवणाऱ्या घटना घडत असतील तर त्याची माहिती त्वरित द्यावी अनेक वेळा बेकायदेशीर बॅनर लावून त्यातून वाद निर्माण होतात. तरी संबंधित बॅनर लावण्यापूर्वी त्या बाबतच्या आवश्यकत्या परवानग्या घेतल्या आहेत का, याची माहिती घ्यावी. सामाजिक तेढ निर्माण करणारे बॅनर लावेल असतील तर त्याची माहितीत त्वरित द्यावी. गाव परिसरात असलेल्या हॉटेल, बार, लॉजिंग मध्ये अनेक वेळा बांग्लादेशीय महिला कामास असतात याची माहिती मिळाल्यास त्यासंदर्भात माहिती द्यावी तसेच वेअरहाऊस मध्ये चोरीचे रॅकेट कार्यरत असते त्याच प्रमाणे बेकायदेशीर ऑइल विक्री, जुगार, हे प्रकार सुरु असतात यातून वाद होतात व या संदर्भात पोलिसांना माहिती द्यावी. त्याच प्रमाणे कित्येक जण कुठलीही परवानगी नसताना पुतळे किंवा धार्मिक स्थळे उभारतात त्या संदर्भात सुद्धा माहिती द्यावी. गावातील चोहोबाजूला सीसीटीव्ही लावण्या संदर्भात आवश्यक त्या सूचना ग्रामपंचायतीला देण्यात आल्या आहेत. ज्या ग्रामपंचायतींची परिस्थिती सीसीटीव्ही उभारण्याची नसेल त्यांनी पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा त्यांना खाजगी संस्थेच्या माध्यमातून मदत करून देण्यात येईल. पोलीस पाटलांचे काम चांगले सुरु असून ते पोलिसांच्या कामाचा भार हलका करीत आहेत.त्यांना काही अडचणी असल्यास त्यांनी थेट संपर्क साधावा असे आवाहन सुद्धा त्यांनी या वेळी केले तर वरिष्ठ पोलीस निरीक्ष रवींद्र दौडकर यांनी सांगितले की, गाव पातळीवर मुके जनावरे चोरी होण्याचे प्रमाण वाढले आहेत. तरी या बाबत सर्वांनी सतर्कता बाळगावी व कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही या कडे लक्ष द्यावे असे आवाहन त्यांनी केले.

# सह्याद्री प्रतिष्ठान तर्फे किल्ले उंदेरी तोफगाडा दुर्गार्पण सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

सह्याद्री प्रतिष्ठान अलिबाग विभागातर्फे दि. ८ मे २०२२ किल्ले उंदेरीवर चार आयर्न ओतीव पद्धतीचे लोखंडी तोफगाडे बसविण्यात आले. तोफगाडा लोकार्पण सोहळा अत्यंत दिमाखात व उत्साहात पार पडला.या सोहळ्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभरातून दुर्गसेवकांनी सहभाग नोंदविला.

रायगड जिल्हा परिषदेचे सभापती दिलीप भोईर (छोटम शेठ), ग्रामपंचायत उपसरपंच माने सर, जय मल्हार मालिकेतील खंडोबाची भुमिका साकारणारे देवदत्त नागे सर व सह्याद्री प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रमीक गोजंगुंडे सर यांच्या प्रमुख उपस्थितीत तोफगाड्यांचा लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. सोहळ्यासाठी उपस्थित सर्व दुर्गसेवकांचे सह्याद्री प्रतिष्ठान अलिबाग विभागाचे अध्यक्ष जितेन म्हात्रे यांनी उपस्थितांचे तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करुन या शिवकार्यात हातभार लावलेल्या सर्वांचेच आभार व्यक्त करुन सोहळ्याचा समारोप केला.



# अनधिकृत भाजीविक्रेत्यासाठी एनएमएमटीचा बस थांबा घेतला बाजूला

**दै.रायगड नगरी । पनवेल**



नवीन पनवेल–आदई सर्कल येथील राजीव गांधी मैदानातील फुटपाथवर अनधिकृत भाजीविक्रेत्यासाठी एनएमएमटीचा बस थांबा काढून तो बाजूला उभारण्यात आला आहे. त्यामुळे कोणीही या, काहीही करा अशी अवस्था मैदान आणि फुटपाथची झाली आहे. पनवेल महानगरपालिका आणि सिडको यापैकी इथे कोण कारवाई करणार असा सवाल रहिवासी विचारत आहेत.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन पनवेल–आदई सर्कल येथे मोठ्या प्रमाणात अनधिकृत फेरीवाल्यांनी बस्तान मांडले आहे. मात्र पालिकेचे अतिक्रमण विभाग कारवाई करत नसल्याने ते सुस्तावले असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. वर्षातून एखाद वेळेस कारवाई केली जाते. त्यानंतर पुन्हा अतिक्रमण करण्यात येते. याच ठिकाणी एनएमएमटी बस थांबा बांधण्यात आला होता. मात्र अनधिकृत भाजीविक्रेत्यासाठी हा एनएमएमटीचा बस थांबा तोडण्यात आला. व तो काही अंतरावर बांधण्यात आलेला आहे. रातोरात हा बस थांबा तोडून दुसरीकडे बांधण्यात आला. मात्र याबाबत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. पनवेल महापालिका हद्दीत कोणीही या, काहीही करून जा अशी अवस्था झालेली असल्याने नागरिक चक्रावून गेले आहेत.

राजीव गांधी मैदानाच्या फुटपाथवर अनधिकृत चिकन, मटण विक्रेत्यांनी गेल्या कित्येक वर्षांपासून दुकाने उभारलेली आहेत. तर दुसरीकडे सायकल रिपेरींग, भाजी, फळ विक्रेत्यांनी जागा विकत घेतल्याप्रमाणे याच ठिकाणी पाय पसरले आहेत.

येथे धंदे लावण्यासाठी पैसे मोजावे लागतात असे एका विक्रेत्याने सांगितले. मात्र हे हे पैसे कोणाच्या खिशात जातात याचा खुलासा त्यांनी केला नाही. त्यामुळे या अतिक्रमणकडे पनवेल पालिकेचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे समोर आले आहे. पालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी याची चौकशी करून कारवाई करावी व येथील अतिक्रमण उद्ध्वस्त करावे अशी मागणी स्थानिक करत आहेत. याबाबत प्रभाग अधिकारी सदाशिव कवठे यांच्याशी संपर्क साधला असता अतिक्रमणवर कारवाई करतो असे सांगितले.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर नावाने सांस्कृतिक भवन बांधून मिळण्याची मागणी

## बौध्दजन पंचायत समिती ता.शाखा म्हसळ्याचे पदाधिकारी यांनी घेतली खा.सुनील तटकरे यांची भेट

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

बौध्दजन पंचायत समिती ता.शाखा म्हसळा यांच्या प्रयत्नातून व महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेले प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नावाने सांस्कृतिक भवन बांधुन मिळणार आहे.

ही योजना तालुका शाखा म्हसळा यांनी राबवण्याचे ठरीवले असून रविवारी संबंधित जागेचे कागदपत्र रायगड जिल्ह्याचे खासदार सुनिल तटकरे यांच्या सुतारवाडी येथील निवासस्थानी भेट घेऊन व चर्चा करुन कागदपत्रे सुपूर्द केली.

तसेच बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र.१ दहा गाव ग्रुप कणघर विभाग येथे असलेल्या शाखेचे कार्यालयात जाणेसाठी पक्का रस्ता नसल्या कारणाने वरिल शाखेचे पदाधिकारी तसेच बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र.१ दहा गाव ग्रुपचे अध्यक्ष यशवंत विष्णु सुर्वे व पंचशील सेवा मंडळ कणघर ग्रामस्थ (मुंबई) यांच्या समवेत कणघर बौद्धवाडी रस्त्या करिता मोठ्या प्रमाणात निधी मिळावा तसेच सकलप येथील विकास कामे व्हावीत यासाठी निवेदन देण्यात आले. तसेच यावेळी सचिव संदिप साळवी यांनी खामगाव बौद्धवाडी येथे अंतर्गत रस्ता आणि सभागृह दुरुस्ती करून मिळावे अशी मागणी खासदार सुनिल तटकरे यांचेकडे केली.

यावेळी म्हसळा तालुक्याच्या ठिकाणी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नावाने सांस्कृतिक भवन बांधणे साठी आवश्यक ते निधीची उपलब्धता करून देण्यात येईल व याकामी सर्वोतोपरी सहकार्य करण्यात येईल असे खासदार सुनिल तटकरे यांनी पदाधिकाऱ्यांना आश्वाशीत केले.

यावेळी रायगड जिल्हा कृषि व पशुसंवर्धन समिती माजी सभापती बबन मनवे यांचे मार्गदर्शनाखाली व कणघर चे माजी सरपंच संतोष (नाना) सावंत यांचे सहकार्याने बौद्धजन पंचायत समिती ता.शाखा म्हसळा अध्यक्ष गजानन साळवी, उपाध्यक्ष अनंत बाळाराम पवार, कोषाध्यक्ष अशोक कृष्णा नाईक, कार्याध्यक्ष स.भी.पवार गुरुजी, माजी अध्यक्ष ३६ गाव शाखा म्हसळा आणि बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र.१ दहा गाव ग्रुप अध्यक्ष यशवंत विष्णु सुर्वे, पाच गाव शाखा सचिव संदिप साळवी हे तालुका शाखेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# सावित्रींच्या लेकींच्या जीवनात आनंदाचे क्षण अधिक बळकट करू : खा. सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**



प्रत्येक विभागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावून अधिकाधिक महिला बचतगट निर्माण करून बचत गटांना फिरता निधी उपलब्ध करून देऊन सावित्रींच्या लेकींच्या जीवनात आनंदाचे क्षण निर्माणकरून हे ऋणानुबंध अधिक बळकट करू असे प्रतिपादन रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी श्रीवर्धन तालुक्यातील शिरवणे गावात जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणी योजना समयी केले.

यावेळी व्यासपीठावर तालुकाध्यक्ष दर्शन विचारे, हरेश्वर सरपंच अमित खोत, पंचायत समिती माजी सदस्य मंगेश कोमनाक, बाळा कोलथरकर, आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना खासदार तटकरे म्हणाले की ज्या प्रमाणे मला व आदितीला मतदान रुपी भरभरून प्रेम दिल. त्याप्रमाणे पूढच्या कालावधीत होत असलेल्या पंचायत समिती व जिल्हापरिषद निवडणूकित पक्षाने दिलेल्या उमेदवाराला मतदान करून या निवडणुकीत घड्याळाचा गजर सुतारवाडी येथे ऐकू आला पाहिजे. ताप मोजायला ज्या प्रमाणे थर्मामिटर लागतो त्याप्रमाणे आमच्या पाठीशी जनता किती आहे हे मोजायचा यंत्र म्हणजे मतपेठी आहे. जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणी योजना शिरवणे, अंतर्गत गटार उदघाटन सोहळा तसेच साखरी येथे नळ पाणी योजना व महिला समाज मंदिर उदघाटन सोहळा पार पडला. पवार साहेबांनी मला अर्थमंत्री केलं राज्याच्या तिजोरीच्या चाव्या माझ्या हातात दिल्या त्यावेळी तालुक्याला पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने काम केलं. त्यानंतर सहा वेळा लोकसभेवर निवडून आलेल्या मात्तब्बर व्यक्तीला बाजूला सारत माझ्या सारख्या काम करणाऱ्या कार्यकर्त्याला निवडून दिल.

त्याच बरोबर अदितीला देखील चाळीस हजार मताधिक्य देऊन निवडून दिल. यावेळी साखरी गावात बोलताना ३५ वर्ष उदघाटन करत आलो, पण गावात एखादं विकास काम झाल्याचं आनंद इतका उत्साह कधी कुठे पहिला नाही. त्यामुळे उर्वरित विकास काम देखील येत्या वर्षभरात पूर्ण होतील असा आश्वासन यावेळी खा. सुनील तटकरे यांनी दिले. पुढील विकास कामांच्या भूमिपूजन तसेच उदघाटन साठी मी पुन्हा येईन म्हणत देवेंद्र फडणवीस यांच नाव न घेता मी त्यांच्या सारखा पुन्हा येईन म्हणत नाही तर समाजसेवा आणि विकास कामांचा व्रत आम्ही अंगिकरल आहे. हा वसा वारसा पुढे चालवण्यासाठी मी पुन्हा येईन असे प्रतिपादन रायगड लोकसभा मतदार संघाचे खासदार सुनील तटकरे यांनी केले. यावेळी घोणस घाट अपघात अत्यंत दुर्दैवी अपघात झाला अधिकाऱ्यांची बैठक घेऊन अप–घात होणार नाहीत याची खबरदारी घेतली जाईल असे देखील तटकरे यांनी सांगितले.

# समाजसेवक कृष्णा महाडिक यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

**दै.रायगड नगरी । तळा**

परेल येथे असणारे नाना पालकर स्मृती ट्रस्टचे व्यवस्थापक कृष्णा महाडिक यांनी कोराना काळात अनेक सामाजिक संस्थांकडून रुग्णांना मदत केली, रक्तदान शिबिर लाऊन रक्ताचा पुरवठा केला, गरजूंना अन्न धांन्याचे वाटप केलं, ऑक्सिजनचा पुरवठा केला, रायगड मध्ये चक्रीवादळात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, या नुकसानीत वैयक्तिक आणि शासकीय क्षेत्रात त्यांनी मदत पोचविली सामाजिक क्षेत्रात त्यांचे उल्लेखनीय काम सुरू आहे कृष्णा महाडिक यांचे सर्व सामान्यांच्या मनात घर केले आहे. सामाजिक क्षेत्रात पहिल्या रांगेत असलेले कृष्णा महाडिक कायम चर्चेत असतात. आता पुन्हा कृष्णा महाडिक यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

विश्वास या सामाजिक संस्थेमार्फत देण्यात येणाऱ्या मानवता की मिसाल या कोरोना वॉरियर्सना देण्यात येणाऱ्या या वर्षीचा पुरस्कार कृष्णा महाडिक यांना देण्यात आला आहे. 'विश्वास या सामाजिक संस्थेमार्फत मुंबई येथील बांद्रा येथील रंगशारदा सभगृहात हिंदी



सिने सृष्टीतील जेष्ठ नायिका झिनत अमान यांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार मिळाल्या बद्दल सर्व स्तरातून कृष्णा महाडिक यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.